| महापारेषण<br>महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित | **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**<br>**( महाराष्ट्र शासन उपक्रम)**<br>(CIN:U40109MH2005SGC153646)<br>**४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग चाकण**<br>प्लॉट नं.पी.१० मर्सीडीज बेन्झ कंपनी समोर, एमआयडीसी चाकण, फेज ३, ता.खेड जि. पुणे ४१० ५०१<br>Email Id:- ee6180@mahatransco.in | |
|---|---|---|


संदर्भ,काअ/४००के.व्ही.ग्र.कें संवसु विभाग/चाकण/ NO - 0036 दिनांक :- 23 JAN 2024

## शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतर्गत सत्र २०२३-२०२४ करीता निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी.

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री (Electrician) व्यवसाय अभ्यासक्रमातून उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडून ४०० के.व्ही. ग्र.कें. संवसु विभाग चाकण करीता ०५ जागां करीता शिकाऊ उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.३०.०८.२०२३ पर्यंत होती.

२. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस. एस. सी. व आय. टी. आय. विजतंत्री (Electrician) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहिती नुसार प्रवर्ग निहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्ते नुसार तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे, अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून वयाच्या जेष्ठते नुसार क्रमवारी लावण्यात आली आले.

४. तात्पुरती निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारी करीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी हि उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामुळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळेस शैक्षणिक पात्रते संबंधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणा करीता ज्या प्रवर्गातून अर्ज सादर केला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे, त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमिलेअर) दि.३१.०३.२०२३ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र, आर्थिकदुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांना EWS आर्थिकदुर्बल घटकबाबतचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडलेचा दाखला, इत्यादी मूळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित ३ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरील पैकी मुळ प्रमाणपत्रे दर्शविण्यास/सादर करण्यास/दाखविण्यास असमर्थ ठरल्यास किंवा मूळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधीत उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहित मुदतीत हजर न झाल्याने अथवा कागदपत्र पडताळणी पात्र ठरुनही दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत रुजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील क्रमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होवून खुल्या तथा राखीव जागांकरीता प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचा अधिकार ४०० के.व्ही. ग्र.कें. संवसु विभाग चाकण राखून ठेवत आहे.

७. तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रणदोषामुळे चुका सुधारित करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार ४०० के.व्ही. ग्र.कें. संवसु विभाग चाकण राखून ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन, ई-मेल किंवा पत्र व्यवहार ४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग चाकण कार्यालयाकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही फोन, ई-मेल किंवा पत्र व्यवहारांची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. तात्पुरती निवड /प्रतिक्षा यादीतुन निवड झालेल्या उमेदवारांनी दि.३१.०१.२०२४ पर्यत 'कार्यकारी अभियंता', ४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग चाकण , प्लॉट नं.पी.१० मर्सीडीज बेन्झ कंपनी समोर एमआयडीसी चाकण, फेज ३, ता. खेड जि.पुणे ४१० ५०१ या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी(शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टया वगळुन), कार्यालयीन वेळेत (११.०० ते १७.००) मुद्दा क्र.५ मध्ये दर्शविलेप्रमाने मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे (सर्व कागदपत्रांच्या छायांकित, स्वयंसाक्षांकित ३ प्रतीसह) पडताळणी करीता हजर रहावे. दि.३१.०१.२०२४ नंतर कागदपत्रे पडताळणी करीता येणाऱ्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

१०. कागदपत्र पडताळणी करीता येणाऱ्या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. सर्व उमेदवारांनी स्वखर्चाने कागदपत्रे पडताळणी करीता उपरोक्त दिलेल्या विहित वेळेत व कार्यालयात उपस्थित राहावे.

Patil 23/01/24

सुहास सखाराम पाटील
कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्र. कें. संवसु
विभाग चाकण

**दिनांक:-२३.०१.२०२४**

# 400 KV RS O&M Division Chakan

## Apprenticeship Selection List For The Year 2023-24

### Provisional Selection list Open Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Chaudhari Ravi Sanjay | General | 94.07 | |
| 2 | Nikhil Gangadhar Ijalkar | ST | 91.48 | Selected against Open |

### Provisional Selection list OBC Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Vaishnavi Shivraj Gitte | OBC | 91.02 | |

### Provisional Selection list SC Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Aditya Sunil Tayade | SC | 89.15 | |

### Provisional Selection list VJ-A Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Avinash Shesherao Rathod | VJ-A | 86.23 | |

## Apprenticeship Waiting List For The Year 2023-24

### Provisional Waiting list Open Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Najmin Shafi Shekh | General | 90.20 | |
| 2 | Shivam Rajesh Kale | OBC | 90.15 | |

### Provisional Waiting list OBC Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Shantanu Santosh Balsaraf | OBC | 88.77 | |

### Provisional Waiting list SC Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Priti Suresh Dongare | SC | 88.39 | |

### Provisional Waiting list VJ-A Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Roshan Bandu Chavhan | VJ-A | 83.15 | |

Patil
23/01/24

**Executive Engineer**
**400 KV RS O&M Division**
**Chakan, MSETCL**